# प्रेस नोट

## परीमंडळ २ पुणे शहर विभागातील बंडगार्डन पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पोलीस आयुक्त,पुणे शहर व पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रा मधून सहा महिने (०६) करीता हद्दपार केलेबाबत

दिनांक :- २८/०२/२०१९

बंडगार्डन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम नामे:- शुभम महेंद्र भोसले वय-२३ वर्षे रा.लेन नं.२०, रुम नं.२९, सिध्दार्थनगर, प्रायव्हेट रोड, १३ ताडीवाला रोड पुणे -०१ यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ २, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक ०६/२०१९ दिनांक २८/०२/२०१९ रोजी सहा महिण्या (०६) करीता पोलीस आयुक्त,पुणे शहर व पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रामधून तडीपार करण्यात आले आहे. सदर इसम हा खून, दरोडा, जखमी करणे, हाताने मारहाण करुन शिवीगाळ करणे, सामाईक इरादा, दुखापत पोहोचविण्याच्या इराद्याने अंगावर धावून जाणे, नुकसान करणे, दंगा करणे, समान उदिष्ट साध्य करण्यासाठी बेकायदेशिर जमावात सामील होणे, घातक शस्त्र जवळ बाळगणे वगैरे गंभीर गुन्हे करत आहे. त्याचे विरुध्द बंडगार्डन, फरासखाना पोलीस ठाणे येथे वरील प्रमाणे गुन्हे दाखल असून त्याची बंडगार्डन पोलीस ठाणे हद्दीमध्ये दहशत असल्याने त्यास बच्चन सिंह, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पुणे शहर यांनी पोलीस आयुक्त,पुणे शहर व पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रा मधून सहा महिने (०६) करीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

(बच्चन सिंह)
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २,
पुणे शहर

# प्रेस नोट

**परीमंडळ २ पुणे शहर विभागातील सहकारनगर पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पोलीस आयुक्त, पुणे शहर व पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रा मधून सहा महिने (०६) करीता हद्दपार केलेबाबत**

दिनांक :- २८/०२/२०१९

सहकारनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम नामे:- अशिष उर्फ मनोंज धोंडिबा भोंडवे.वय-२८ वर्षे,रा.बिल्डींग नं.४,स्वामी समर्थ सोसायटी,धनकवडी, पुणे यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ-२, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक ०७/२०१९ दिनांक २८/०२/२०१९ रोजी सहा महिने (०६) करीता पोलीस आयुक्त,पुणे शहर व पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रा बाहेर तडीपार करण्यात आले आहे. सदर इसम दुखापत करणे, वाहनचोरी करणे, घातक शस्त्रे जवळ बाळगणे, शिवीगाळ करुन मारहाण करणे वगैरे गंभीर गुन्हे करत आहे. त्याचे विरुध्द सहकारनगर पोलीस ठाणे येथे वरील प्रमाणे गुन्हे दाखल असून त्याची सदर भागात दहशत असल्याने त्यास बच्चन सिंह, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२, पुणे शहर यांनी पोलीस आयुक्त,पुणे शहर व पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रा बाहेर सहा महिने (०६) करीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

(बच्चन सिंह)
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २
पुणे शहर